No part of this Special Issue shall be copied, reproduced or transmitted in any form or any means, such as Printed material, CD – DVD / Audio / Video Cassettes or Electronic / Mechanical, including photo, copying, recording or by any information storage and retrieval system, at any portal, website etc.; Without prior permission.

**Aayushi International Interdisciplinary Research Journal**

**ISSN 2349-638x**

Special Issue No.141

Jan.2025

**Disclaimer**

Research papers published in this Special Issue are the intellectual contribution done by the authors. Authors are solely responsible for their published work in this special Issue and the Editor of this special Issue are not responsible in any form.

# २०१५ पासूनच्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त अर्थतज्ञांचे आर्थिक विचार


| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | प्रा. डॉ. बालाजी घुटे | २०२४ मध्ये नोबेल पारितोषिक प्राप्त डेरन एस्मोग्लू, सायमन जॉन्सन व जेम्स रॉबिन्सन यांचे आर्थिक विचार | 1 |
| 2. | डॉ. स्वप्नजा पाठक | लातूर शहरातील गिग आणि डिजिटल प्लॅटफॉर्म कामगारांचा अनुभवजन्य पुराव्यावर आधारित आर्थिक-सामाजिक अभ्यास: लिंगभाव प्रश्नावर विशेषभर | 5 |
| 3. | सौ.महादेवी मारोती तेगमपुरे / शेळगावकर | अभिजीत बॅनर्जी यांचे गरीबीचे अर्थशास्त्र | 12 |
| 4. | प्रा.डॉ.अनिल दि.वाडकर | क्लॉडिया गोल्डीन यांचे श्रम बाजारातील योगदान | 16 |
| 5. | डॉ. कारभारी भालचंद्र काशिनाथ,<br>डॉ. वायकर भूषण अण्णा | वर्तणूक अर्थशास्त्रातील जटिल मानवी वर्तनाचा रिचर्ड थॅलर यांनी केलेल्या संशोधनाचा टिकात्मक आढावा | 24 |
| 6. | डॉ. धनश्री धनंजय आंबेकर | अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार विजेत्यांच्या योगादानाविषयक अभ्यास | 29 |
| 7. | डॉ. दिग्विजय पाटील | आधुनिक अर्थशास्त्रातील नवे आयाम: अभिजित बॅनर्जी यांचे योगदान | 36 |
| 8. | डॉ. अरुण चांदणे | अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक योगदान | 41 |
| 9. | डॉ. लाजवंती आर.टेंभूर्णे ,<br>प्रिती ग. कुंभारे | भारताच्या आर्थिक विकासात नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन यांच्या कल्याणकारी अर्थशास्त्राच्या विचाराची प्रासंगिकता | 47 |
| 10. | डॉ. नयना भिमराव पाटील | 2015 पासूनच्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृति पारितोषिक प्राप्त अर्थतज्ञांचे आर्थिक विचार | 51 |
| 11. | डॉ.संजय शिवाजी ओमासे | डॅरेन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्स : संस्थांत्मक व्यवस्थेच्या सामाजिक आर्थिक प्रभावाचे विश्लेषण करणारे अर्थशास्त्रज्ञ | 57 |
| 12. | गणेश आदिनाथ टेकळे | रिचर्ड थेलर यांच्या सैद्धांतिक योगदानातील वर्तणूकीच्या अर्थशास्त्राचे भविष्य | 60 |
| 13. | नानासाहेब श्रीरंग पटनुरे,<br>प्रा.डॉ.सी.जे. देशमुख | अभिजीत बॅनर्जी यांचे दारिद्रय विषयक विचार | 65 |
| 14. | प्रा. डॉ.रमेश भालेराव,<br>संदीप दौलतगिर गिरी | २०१५ पासूनच्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त अर्थतज्ञांचे आर्थिक विचार | 70 |
| 15. | खंदारे सचिन रमेश,<br>प्रा. डॉ. सुनिल नरवडे | अभिजित बॅनर्जी यांचे आर्थिक विचार- विकास अर्थशास्त्रातील नवकल्पना | 73 |
| 16. | डॉ. शिवाजी काकडे | क्लॉडिया गोल्डिन यांचे महिलांच्या श्रम बाजारातील सहभागाविषयी विचार | 78 |

# डॅरेन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्स :- संस्थांत्मक व्यवस्थेच्या सामाजिक आर्थिक प्रभावाचे विश्लेषण करणारे अर्थशास्त्रज्ञ

**डॉ.संजय शिवाजी ओमासे**
सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग महावीर महाविद्यालय कोल्हापूर.
sanjayomase2013@gmail.com

**घोषवारा किंवा सारांश**

*आर्थिक प्रगती किंवा समृद्धी मध्ये संस्थात्मक रचना महत्वाची ठरते. या अर्थशास्त्रज्ञांनी केलेले संशोधन राष्ट्र - राष्ट्रांमधील समृद्धीमधील फरक समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरणारे आहे.*

*दोषपूर्ण संस्थात्मक रचना आणि संस्थात्मक रचनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अभावी राष्ट्रीय गरीब राहतात असा निष्कर्ष २०२४ मधील नोबेल विजेते अर्थतज्ज्ञांनी काढला आहे.*

*विकसनशील देशाने आर्थिक संस्थां रचना आणि अंमलबजावणी याकडे पुरेसे लक्ष देणे आवश्यक असल्याचे मत डॅरेन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्स या या नोबेल विजेते अर्थतज्ञाने मांडले आहे.राष्ट्रीय समृद्ध होण्यासाठी संस्थांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. राष्ट्रातील सर्व प्रकारच्या सामाजिक व राजकीय ज्या औपचारिक अनौपचारिक पद्धतीने कार्य करतात अश्या सर्व संस्था सर्वसामावेशक असतील तर नागरिकांना सक्षम बनवणे उद्योजकांच्या नवकल्पना वाढीला चालना देणे शक्य होते .वर्षानुवर्षे प्रगती करूनही जे गरीब देश श्रीमंत देशांसारखा विकास कसा होऊ शकले नाहीत अशा देशांना त्यांच्या राष्ट्रातील संस्थात्मक व्यवस्थेकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन किंवा अंतरदृष्टी या संशोधनातून निश्चितपणे मिळेल.वसाहतवादाच्या प्रक्रियेतून होणारा आर्थिक विकास आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत निर्माण होणारी विषमता यांचा इतिहास स्पष्टपणे उलघडून दाखवत वर्तमान काळातील विकास प्रक्रियेकडे पाहण्याची अंतदृष्ठी आणि भविष्यकालीन विकासाच्या प्रक्रियेकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन प्रदान करणारे संशोधन डॅरेन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्स यांनी केले आहे.*

## I) प्रस्ताविक किंवा पार्श्वभूमी

अर्थशास्त्रातील नोबेल आल्फ्रेड नोबेल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आल्फ्रेड नोबेल स्वेरिजेस रिक्सबँक पुरस्कार दिला जातो, जरी अल्फ्रेड नोबेलने त्यांच्या मृत्युपत्रात अर्थशास्त्राच्या पुरस्काराचा उल्लेख केलेला नसला तरी सुद्धा Sveriges Riksbank ने 1968 मध्ये पारितोषिकाची स्थापना केली आणि 1969 पासून रॉयल स्वीडिश अकादमी ऑफ सायन्सेसला पारितोषिक विजेत्यांची निवड करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. 2024 या वर्षातील अर्थशास्त्र विषयातील नोबेल पुरस्कार डॅरेन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्स या तीन अर्थशास्त्रज्ञांना जाहीर झाला आहे. डॅरेन एसेमोग्लू हे (मूळचे तुर्की सध्या अमेरिकन) तुर्की-अमेरिकन तर सायमन जॉन्सन आणिजेम्स ए. रॉबिन्सन हे दोघे( मूळचे ब्रिटन देशातील पण सध्या अमेरिकन) ब्रिटिश-अमेरिकन आहेत.

विविध राजकीय संस्थांची निर्मिती आणि त्याचा समाजाच्या प्रगतीवर होणारा परिणाम याविषयी केलेल्या संशोधनासाठी त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. वर्षानुवर्षे प्रगती करूनही गरीब देशांचा श्रीमंत देशांसारखा विकास का होऊ शकला नाही याची पद्धतशीर आणि शास्त्रीय चिकित्सा या तीन अर्थशास्त्रज्ञांनी केली आहे.या तिघांनी संस्था कशा तयार होतात आणि समाजाच्या कल्याणावर त्याचा कसा प्रभाव पडतो याबाबत संशोधन केले. त्यांच्या संशोधनातून हे सिद्ध झाले की एखादे सशक्त आणि निष्पक्ष संस्था.उदा- चांगले सरकार आणि कायदा व्यवस्था लोकांच्या आयुष्यावर सकारात्मक परिणाम करतात.

## II) शोधनिबंधाचे उद्देश :-

प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी पुढील उद्देशाने केली आहे.

1. 2024 मध्ये नोबेल पुरस्कार ने सन्मानित करण्यात आलेल्या करण्यात अर्थशास्त्रज्ञांचा व्यक्ती व ग्रंथ परिचय थोडक्यात सादर करणे.
2. संस्थात्मक अर्थशास्त्र किंवा अर्थव्यवस्था ही संकल्पना स्पष्ट करणे.
3. संस्थांची निर्मिती आणि आर्थिक विकास यासंबंधी डॅरेन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्स यांनी मांडलेले आर्थिक विचार स्पष्ट करणे.
4. डॅरेन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्स यांच्या संशोधनाची गरज किंवा उपयुक्तता समजून घेणे.

**III) 2024 मध्ये नोबेल पुरस्कार सन्मानित अर्थशास्त्रज्ञाचा व्यक्ती व ग्रंथ परिचय**

2024 मध्ये अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्काराने गौरवण्यात आलेले डॅरेन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्स हे तीनही अर्थशास्त्रज्ञ अमेरिकन आहेत. डॅरॉन एसेमोग्लू हे आर्मेनियन वंशाचे तुर्की-अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ आहेत, ते मॅसॅच्युसेट्स इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (MIT) मध्ये प्राध्यापक आहेत.1993 पासून एसेमोग्लू यांनी त्यांच्या संशोधन कार्यात राजकीय आणि आर्थिक संस्थांचा प्रभाव समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. Why Nation Fails या त्यांच्या गाजलेल्या पुस्तकांमध्ये त्यांनी राष्ट्राच्या अधोगतीची कारणे स्पष्ट केली आहेत. याचबरोबर त्यांनी सायमन जॉन्सन जेम्स ए. रॉबिन्सन यांचेसह The Narrow Corridor,Power and Progress या काही ग्रंथांचे ,संदर्भ ग्रंथांचे व संशोधन लेख लिहिले आहेत.त्याच्याशिवाय सायमन जॉन्सन हे मूळचे ब्रिटनचे पण अमेरिकेत स्थायिक आणि केंब्रिज विद्यापीठामध्ये प्राध्यापक आहेत.जेम्स ए. रॉबिन्सन हे युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो, आयएल, यूएसए येथे प्राध्यापक आहेत जेम्स ए. रॉबिन्सन हे युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो यूएसए येथे प्राध्यापक आहेत. जॉन्सन -रॉबिन्सन यांनी जागतिक अर्थव्यवस्थेतील गुंतागुंत स्पष्ट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**संस्थांची निर्मिती आणि आर्थिक विकास यासंबंधी मांडलेले आर्थिक विचार**

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये त्या देशातील संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. 19190 मध्ये अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ वॉल्टन हे मिल्टन यांनी अशा प्रकारच्या संस्थात्मक अर्थशास्त्राच्या अभ्यासाला सुरुवात केली. त्यानंतर थोरस्टीन वेबलेन, रोबोट फ्रेंक, जॉन केनेत गालब्रेथ गुन्हा मिरडोल यासारख्या अर्थशास्त्रज्ञानी संस्थात्मक अर्थशास्त्राची पायाभरणी केली.डॅरॉन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्सन यां अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेत्या अर्थशास्त्रज्ञांनी औपचारिक अनौपचारिक संस्था का व कशा निर्माण होतात आणि राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक समृद्धीवर कसा आणी कोणता परिणाम होतो याची तर्कशुद्ध व अनुभवजण्य विश्लेषण केले आहे.

राजकीय संस्था कोणत्या परिस्थितीत निर्माण होतात आणि बदलतात हे स्पष्ट करण्यासाठी या अर्थशास्त्रज्ञानी तीन सामाजिक घटकांचा एकत्रित विचार करून एक मॉडेल किंवा प्रारूप विकसित केले आहे. हे प्रारूप राजकीय संस्थांचा समाजावरीलप्रभाव 3 प्रकारे किंवा घटकांद्वारे स्पष्ट करतेया प्रारूपातील पहिला घटक म्हणजे संसाधनांचे वाटप आणि वितरण कसे केले जाते आणि समाजात निर्णय घेण्याची शक्ती अन अधिकार कोणाकडे आहे.या आधारावर श्रीमंत वर्ग आणि सामान्य लोक यांच्यात संघर्ष आहे. उच्चभ्रू किंवा जनसामान्य या दोहो मध्ये संसाधनाच्या वाटप आणि वितरणावरून होणारा हा संघर्ष आहे. दुसरा घटक म्हणजे जनता संघटित होऊन कधी कधी सत्ताधारी वर्गाला धमकावते. असे करून ते सरकारला त्यांच्या म्हणण्याशी सहमत करून घेतात. त्यामुळे निर्णय घेण्याच्या अधिकारापेक्षा समाजातील सत्ता अधिक आहे, असे म्हणता येईल.सत्ताधारी वर्गाला एकत्र करून आणि धमकावून सत्तेचा वापर करण्याची संधी मिळते. समाजातील जनसामान्याकडे असणारी शक्ती ही निर्णय घेण्याच्या शक्तीपेक्षा अधिक असते.तिसरा घटक म्हणजे वचनबद्धतेची समस्या, ज्याचा अर्थ शासक वर्गाने निर्णय घेण्याची शक्ती लोकांच्या हाती सोपवणे हा एकमेव पर्याय शासक वर्गाकडे उरतो.अनेक वेळा श्रीमंत शासक वर्गाला निर्णय घेण्याचे अधिकार जनतेच्या हाती देण्याची सक्ती असते.

या तिघा अर्थशास्त्रज्ञांनी हे दाखवून दिले आहे की कायद्याचे कमकुवत नियम असलेले समाज आणि लोकसंख्येचे शोषण करणाऱ्या संस्था अधिक चांगल्यासाठी वाढ किंवा बदल घडवून आणत नाहीत. या अर्थशास्त्रज्ञांचे संशोधन असे सिद्ध करते की वसाहतीच्या काळात सुरू झालेल्या सामाजिक संस्था मुळे देशांच्या समृद्धीमधील

फरक दिसून येतो ज्या देशांमध्ये वसाहत असताना गरीब होते अशा देशांमध्ये समावेशक संस्था सुरू केल्या गेल्या, कालांतराने जनता सामान्यतः संपन्न झाली. पूर्वीच्या वसाहती ज्या पूर्वी श्रीमंत होत्या त्या आता गरीब का झाल्या आहेत याचे कारण सुद्धा संस्थांची सुमार कार्यपद्धती आहे हे यांच्या संशोधनातून सिद्ध होते.

**निष्कर्ष किंवा समारोप**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या समारोपामध्ये 2024 सालातील नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ डॅरेन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्स यांनी केलेल्या संशोधनाची गरज किंवा उपयुक्तता स्पष्ट केली आहे.आजच्या सद्यस्थितीमध्ये बहुतांशी विकसनशील राष्ट्रातील सामाजिक आर्थिक व राजकीय परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर स्थित्यंतरे घडताना दिसून येत आहेत.ही परिस्थिती सुधारण्यासाठी वरील तीन अर्थ शास्त्रज्ञांचे विचार उपयुक्त ठरणारे आहेत.राष्ट्राचे कल्याण आणि जनसामान्यांचे कल्याण साध्य होण्यासाठी विकसनशील राष्ट्रांनी आपल्या देशातील सर्व प्रकारच्या औपचारिक व अनौपचारिक संस्थांची कार्यपद्धती सुधारुन त्या संस्थाना सक्षम बळकट बनवणे आवश्यक आहे. या वर्षीच्या नोबेल विजेत्या अर्थशास्त्रज्ञाचे विचार आणि योगदान हे अधोरेखित करते की संस्था केवळ आर्थिक विकासासाठीच नव्हे, तर समृद्धी आणि सामाजिक कल्याणासाठीही महत्त्वाच्या आहेत. या अर्थशास्त्रज्ञांनी केलेले संशोधन शासन कर्त्यांना आगामी काळातील संस्थाविषयक धोरण व दिशा ठरवण्यासाठी आणि त्या संबंधी आर्थिक तत्त्वांची फिरविचार आणि पुनर मांडणी करण्यासाठी उपयुक्त ठरणारे आहे

वर्षानुवर्षे प्रगती करूनही जे गरीब देश श्रीमंत देशांसारखा विकास कसा होऊ शकले नाहीत अशा देशांना त्यांच्या राष्ट्रातील संस्थात्मक व्यवस्थेकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन किंवा अंतरदृष्टी या संशोधनातून निश्चितपणे मिळेल.वसाहतवादाच्या प्रक्रियेतून होणारा आर्थिक विकास आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत निर्माण होणारी विषमता यांचा इतिहास स्पष्टपणे उलघडून दाखवत वर्तमान काळातील विकास प्रक्रियेकडे पाहण्याची अंतदृष्ठी आणि भविष्यकालीन विकासाच्या प्रक्रियेकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन प्रदान करणारे संशोधन डॅरेन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन आणि जेम्स ए. रॉबिन्स यांनी केले आहे.

**संदर्भ:-**

1. डॉ. अपर्णा कुलकर्णी; वसाहतवाद विकास आणि विषमतेच्या इतिहासातून भविष्याकडे..... दि.20/10/2024 दैनिक लोकसत्ता रविवार विशेष
2. डॉ. विजयकुमार ककडे; तंत्र गुलामीचा धोका रविवार दि.20/10/2024 दैनिक दैनिक पुढारी बहार विशेषांक
3. https://pudhari.news/international/acemoglu-johnson-and-robinson-announced-the-nobel-prize-in-economics
4. https://www.theigc.org/sites/default/files/2016/06/acemoglu-2007.pdf
5. https://www.theigc.org/sites/default/files/2016/06/acemoglu-2007.pdf
6. https://www.jagranjosh.com/current-affairs/nobel-prize-in-economics-announced-for-research-on-global-inequalities-1728915921-1

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

March- 2024

ISSUE No - (CDLXIII) 463

## 75th Years of Indian Economy: Achievements and Challenges




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor
Dr. R. K. Shanediwan
Principal
Shri Shahaji Chhatrapati
Mahavidyalaya, Kolhapur

Editor
Prof. Dr. Mrs. S. S. Rathod
Head, Deptt. of Economics,
Shri Shahaji Chhatrapati
Mahavidyalaya, Kolhapur

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLXIII) 463
ISSN : 2278-9308
March, 2024

### 1.3 विदेशी प्रत्यक्ष भांडवलः- संकल्पना

देशात गुंतवणुकीच्या उद्देशाने देशाच्या भौगोलिक सीमा बाहेरील देशातून येणारी भांडवल म्हणजे विदेशी भांडवल होय. विदेशी भांडवलाच्या संकल्पनेत विदेशी संयुक्त गुंतवणूक, बहिर्गत व्यापारी कर्जे, आंतरराष्ट्रीय संस्था कर्जे, अंतर सरकारी कर्जे इ. मुख्य घटकांबरोबरच आणखी एक अत्यंत महत्त्वाचा घटक आणि प्रकार आहे तो म्हणजे विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक हा होय.

### 1.3.1 विदेशी प्रत्यक्ष भांडवल :- अर्थ व्याख्या व स्वरूप

" थेट परदेशी गुंतवणूक म्हणजे दुसऱ्या देशातील एखाद्या व्यक्तीने अथवा कंपनीने उत्पादनामध्ये किंवा व्यवसायामध्ये केलेली थेट गुंतवणूक होय. " दुसऱ्या एखाद्या देशातील व्यक्तीने किंवा कंपनीने आपल्या देशातील व्यवसायामध्ये उत्पादनामध्ये, विविध प्रकल्पामध्ये केलेली थेट गुंतवणूक ही प्रत्यक्ष गुंतवणूक असते. अशा गुंतवणुकीमुळे दोन्ही देशांना फायदा होतो.

थोडक्यात विदेशातील व्यक्तीने अथवा कंपनीने स्वतःचं व्यवस्थापन करणे, विलीनीकरण आणि ताबा घेण्याच्या माध्यमातून, संयुक्त प्रकल्पांच्या माध्यमातून यजमान देशात प्रत्यक्षात गुंतवणूक करण्यास' एफ डी आय ' म्हणजेच विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक असे म्हणतात.

### 1.3.2 विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक देशात प्रवेश करण्याचे मार्गः-

थेट परकी गुंतवणूक दोन पद्धतीने देशामध्ये प्रवेश करत असते. पहिली पद्धत म्हणजे' ऑटोमॅटिक रूट ' आणि दुसरी पद्धत किंवा मार्ग म्हणजे' परकीय गुंतवणूक ' प्रोत्साहन मंडळाच्या मंजुरीनंतर येऊ शकणारी गुंतवणूक. केंद्र सरकारने प्रत्येक क्षेत्रामध्ये ' एफडीआय ' ची कमाल मर्यादा निश्चित केलेली असते. त्यावर विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक अवलंबून असते. ज्या क्षेत्रामध्ये 100% मर्यादा आहे. ' ऑटोमॅटिक रूट' ने सहजपणे जाता येते 'ऑटोमॅटिक रूट ' ने होणाऱ्या गुंतवणुकीवर रिझर्व बँकेचे नियंत्रण असते. जर निश्चित मर्यादेपेक्षा जास्त गुंतवणूक असेल तर मात्र संबंधित प्रस्ताव परकीय गुंतवणूक प्रोत्साहन मंडळाच्या मंजुरीनंतर देशात येऊ शकते.

### 1.4 भारतातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीची सद्यस्थिती :-

भारतातील केंद्र सरकारने अलीकडील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक विषयक धोरणानुसार प्रत्येक क्षेत्रामध्ये ' एफ डी आय ची' कमाल मर्यादा निश्चित केलेली आहे. ती पुढील प्रमाणे :-

तक्ता क्र.1 भारतातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीची सद्यस्थिती

| गुंतवणुकीचे क्षेत्र | गुंतवणुकीची मर्यादा |
|---|---|
| रासायनिक उद्योग, वस्त्रोद्योग क्षेत्र, प्रादेशिक हवाई वाहतूक सेवा, देशांतर्गत अनुसूचित प्रवासी विमान कंपनीमध्ये, दूरसंचार, सिंगर ब्रँड रिटेल, कुरियर सेवा, चहाचे मळे, जाहिरात, शेती, औषधे, वीज निर्मिती, टाऊनशिप्स, मास रॅपिड, वाहतूक यंत्रणा, बिगर बँकिंग वित्तीय सेवा, तेल उत्खनन, पेट्रोलियम उत्पादनाची मार्केटिंग, प्रदूषण नियंत्रण, विज्ञान-तंत्रज्ञानाविषयक मासिके, रस्ते महामार्ग बंदरे, विशेष आर्थिक क्षेत्र, वाहतूक पायाभूत सुविधा विमा मध्यस्थ ऑटोमोटिव्ह क्षेत्र ऑपरेशन्स व्यतिरिक्त रेल्वे - हाय स्पीड ट्रेन, रेल्वे इलेक्ट्रिफिकेशन, पॅसेंजर टर्मिनल, मास रॅपिड ट्रान्सपोर्ट सिस्टीम इत्यादी रेल्वे. इ. | 100% |
| विमा क्षेत्र पेन्शन क्षेत्र, पतमानांकन कंपन्या, प्रसारण, डीटीएच कोळसा, लिग्नाइट, खाणकाम,उपग्रहे संरक्षण उत्पादन युनिट्स इ. | 74% |
| नागरी वाहतूक, संरक्षक उत्पादन, पेट्रोलियम, शुद्धीकरण, ऊर्जा विनिमय, शेअर बाजार आणि डिपॉझिटरी, खाजगी बँका इ. | 49% |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLXIII) 463
ISSN : 2278-9308
March, 2024

संदर्भ दै. 1 महाराष्ट्र टाइम्स दि.17 ऑगस्ट 2014 चा अंक,
2. भारताचे आर्थिक सर्वेक्षण 2022

**1.4.2 भारतातील विविध क्षेत्रांमध्ये झालेली विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक :-**

तक्ता क्रमांक 2

| | 2014-15 | | 2022-23 | |
|---|---|---|---|---|
| | क्षेत्र **Top Five sectors** | गुंतवणूक ( कोटी रुपयांमध्ये ) एकूण एफडीआय मधील (%) प्रमाण | क्षेत्र **Top Five sectors** | गुंतवणूक (अब्ज USD मध्ये) एकूण एफडीआय मधील (%) प्रमाण |
| 1. | सेवा | 1,82,955/- (18%) | संगणक सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर | 29.5104 अब्ज USD (34%) |
| 2. | ग्रहबांधणी | 1,06,963/- (11%) | सेवा | 18.656 अब्ज USD (22%) |
| 3. | दूरसंचार | 59,796/- (6%) | वाहन उद्योग | 10.082 अब्ज USD (11.89%) |
| 4. | सॉफ्टवेअर | 59,796/- (6%) | व्यापार | 6.546 अब्ज USD (7.72%) |
| 5. | औषध निर्माण | 56,008/- (5%) | बांधकाम आणि पायाभूत सुविधा | 4.680 अब्ज USD (5.52%) |
| 6 | - | - | इतर क्षेत्र | 15.857 अब्ज USD (18.7%) |

संदर्भ दै. 1 महाराष्ट्र टाइम्स दि.17 ऑगस्ट 2014 चा अंक,
2. भारताचे आर्थिक सर्वेक्षण 2022

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, संगणक सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर आणि सेवा क्षेत्रामध्ये सर्वाधिक विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक झालेली असून ती एकूण गुंतवणुकीच्या 50 % इतकी आहे. त्यानंतर ग्रह बांधणी,वाहन उद्योग क्षेत्रा बांधकाम आणि पायाभूत सुविध क्षेत्रामध्ये गुंतवणूक झालेली आहे.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLXIII) 463
ISSN : 2278-9308 March, 2024

झाली होती. परिणामी रोजगार निर्मिती, पायाभूत सोयी सुविधांचा विकास, नियती वाढ, व्यावसायिक, पर्यावरणात अनुकूल बदल यासारखे परिणाम दिसून येत आहेत.आर्थिक वर्ष 2021 मध्ये सर्वाधिक थेट परदेशी गुंतवणूक झालेली पाच राज्य आहेत ,कर्नाटक (37.55%), महाराष्ट्र (26.26%),दिल्ली(13.93%),तामिळनाडू (5.10%) आणि हरियाणा ( 4.76%) कर्नाटक,महाराष्ट्र आणि दिल्ली या ठिकाणी एकूण गुंतवणुकीच्या 50% गुंतवणुकीची केंद्रीकरण झाले आहे.

भारत सरकारने विविध क्षेत्रांमध्ये एफडीआय धोरणांचे उदार धोरण राबविले आहे. या मध्ये लक्षणीय बदल समाविष्ट आहेत. विमा, संरक्षण, टेलिकॉम, आर्थिक सेवा, औषधनिर्माण क्षेत्र, किरकोळ व्यापार, ई-कॉमर्स,बांधकाम आणि विकास, नागरी विमानसेवा आणि उत्पादन क्षेत्र इत्यादी क्षेत्रात थेट परकीय गुंतवणूक वाढावी यासाठी केंद्र सरकारनं विविध सुधारणा धोरण राबविले आहे विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सुयोग्य धोरणानुसार योग्य वातावरण निर्मिती केली तर प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचे प्रमाण वाढून भारतातील‘ विदेशी गुंतवणुकीची ’ गरज पूर्ण होऊन आर्थिक विकासाच्या दरात वाढ होईल.

**संदर्भसूची :-**

1. प्रा. डॉ. जे. एफ पाटील, (2011), वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
2. प्रा. भोसले प्रा. काटे(2012) विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन फडके प्रकाशन, कोल्हापूर.
3. गौरव, दत्त, अश्विनी महाजन (2014) भारतीय अर्थव्यवस्था एस चांद प्रकाशन दिल्ली.
4. महाराष्ट्र टाइम्स 17 ऑगस्ट 2014 अंक.
5. सकाळ 1 ऑगस्ट 2014 चा गुंतवणूक विशेष अंक.
6. www.cso.org.
7. www.unctad.org.
8. https://pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=1845794#:~:text
9. भारताचे आर्थिक सर्वेक्षण 2022
10. यूएन कॉन्फरन्स ऑन ट्रेड अँड डेव्हलपमेंट (UNCTAD) जागतिक गुंतवणूक अहवाल 2020

Re-Accredited A++ Grade by NAAC 3.60 CGPA

'Social Transformation Through Dynamic Education'

**Bharati Vidyapeeth (Deemed to be University), Pune (India)**

FOUNDER-CHANCELLOR : DR. PATANGRAO KADAM

**Yashwantrao Mohite College of Arts, Science & Commerce, Pune - 38**

Multi-Disciplinary International Conference on

# IKS Teaching and Curriculum Designing: Challenges for Teachers and Future Pathways

Friday, 28th & Saturday, 29th March 2025

iksha | BORI | brhat | SIDDHANTA

# Certificate

1837 Jewels — Chandukaka Saraf Jewels | NCF | मराठी विज्ञान परिषद संशोधन संस्था

This is to certify that **Dr. Sujata Patil** has successfully presented a research paper entitled **'छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक विचारः- एक संक्षिप्त आढावा'** co-authored by **Dr. Sanjay Omase, Prof. Mansing Patil** at the **Multidisciplinary International Conference on IKS Teaching and Curriculum Designing: Challenges for Teachers and Future Pathways held on 28th & 29th March, 2025** at Bharati Vidyapeeth (Deemed to be University) Yashwantrao Mohite College of Arts, Science and Commerce, Pune – 38.

This presentation contributed significantly to the academic discourse and enriched discussions in the field. We appreciate their valuable research and scholarly engagement.

**Dr. Suhas Mohite**
Organising Secretary

**Prof. (Dr) Vivekanand A. Rankhambe**
Organising President

Registration No.